| MHBI100001772026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४३/२०२६ |
| --- | --- |
| | छत्रभुज बाबुराव करपे व इतर<br>- विरुध्द -<br>निरंक |

## निशाणी क्र.१ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार यांनी महाराष्ट्र रेग्युलेशन ॲक्ट VIII, १८२७ मधील कलम २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन आहे की, मयत बाबुराव गोविंदराव करपे हे दिनांक १८.११.२०२५ रोजी मौजे जवळबन, ता. केज जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र.३ व ४ हया मयताच्या मुली आहेत. मयत बाबुराव यांची पत्नी रुक्मीणबाई बाबुराव करपे हया दिनांक २७.०८.२०१४ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच मयत बाबुराव यांची आई सखुबाई गोविंदराव करपे हया देखील पुर्वीच मयत झालेल्या आहेत. अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत हे मौजे जवळबन, ता.केज जि.बीड येथील कायम रहिवाशी होते. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे मयत बाबुराव गोविंदराव करपे यांचे अर्जदार हे कायदेशिर वारस आहेत, हे जाहिर करुन तसा वारसा दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. अभिलेखावरील पुरावा व कागदपत्रांचा विचार करता खालील प्रश्न माझे विचाराधीन आले. त्यावर माझे कारणमिमांसेसह उत्तर खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत का ? | : होकारार्थी. |
| २. | आदेश कोणता ? | : अर्ज मंजूर करण्यात येतो. |

**<u>प्रश्न क्र.१ करिता</u> :**

४. अर्जातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदार क्र.१ छत्रभुज पि. बाबुराव करपे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे. त्यांनी अर्जातील कथने त्यांच्या सरतपासामध्ये नमुद केलेली आहेत. अर्जदार यांनी मयत बाबुराव गोविंदराव करपे यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी क्र.५), ग्रामपंचायत कार्यालय, जवळबन यांचे वारस प्रमाणपत्र व अर्जदार यांच्या आधार कार्डच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. निशाणी क्र.१२ वर पुरसिस दाखल करुन अर्जदार यांनी पुरावा बंद केला आहे.

५. प्रस्तुत केसमधील जाहिरनामा (निशाणी क्र.७) ग्रामपंचायत कार्यालय, जवळबन, तहसिल कार्यालय, केज व या न्यायालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात आला. तसेच प्रकरणाचा जाहीरनामा (निशाणी क्र.१०) दैनिक 'संकेत' या अंकात दिनांक ०१.०२.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आला व अर्जदार यांच्या अर्जास हरकत असल्यास या कार्यालयास कळविण्याबाबत कळविण्यात आले. परंतु अद्यापपावेतो कोणतीही हरकत नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांचा लेखी व तोंडी पुरावा आव्हानित झालेला नाही. प्रस्तूत अर्जाच्याकामी अर्जदार यांनी दाखल केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकांना पुरक असून तो अबाधित राहिलेला आहे. मृत्यू प्रमाणपत्रावरुन बाबुराव गोविंदराव करपे हे मयत असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस असल्याचे दिसून येत असल्यामुळे ते वारस

प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**प्रश्न क्र.२ करिता :**

६. अर्जदार हे वरीलप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदवलेला आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून प्रश्न क्र.२ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार हे मयत **बाबुराव गोविंदराव करपे** यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे तरतूदीनुसार दिवाणी नियमावली (Civil Manual) परिच्छेद ३१२ मधील तरतूदींची पुर्तता करुन विहित न्यायालयीन शुल्क जमा केल्यानंतर नियमानुसार देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MANALI SHRIKANT KULKARNI
Date: 2026.03.23 17:10:19 +0530

केज.
दिनांक : २३.०३.२०२६

**(मनाली एस. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 23.03.2026 |
| Transcribed on | : --------------- |
| Checked & signed on | : 23.03.2026 |

Sd/-

(M.A.Kulkarni),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.